J 18-19.

18-19

R.K. Arya
Sanskrit Dept.

(80)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi | January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भगवदगीते मधील काही निवडक श्लोकातील तत्वचिंतन एक अध्ययन<br>**सहा. प्रा. प्रज्ञा वि. इंगळे** | ७०-७४ |
| १५ | निक्षेपाद्वारे सांगितलेली गुरू संकल्पना आचार्य यशोविजयजींच्या दृष्टीकोनातून<br>**प्राजक्ता कुलभूषण धर्मराव** | ७५-८० |
| १६ | न्यायशास्त्रातील 'ईश्वर' संकल्पनेचे विवेचन<br>**प्रतिभा परेतकर** | ८१-८६ |
| १७ | ऋग्वेदात दार्शनिक (तात्विक) चिन्तन<br>**प्रा. राजेंद्रप्रसाद किशनराव आर्य** | ८७-८९ |
| १८ | आधुनिक काळात योगाची आवश्यकता<br>**प्रा. रश्मी कुलकर्णी** | ९०-९५ |
| १९ | आधुनिक शिक्षण पद्धतीत भारतीय न्याय दर्शनातील प्रमाणांचे महत्त्व<br>**संपदा श्रीपादराव पाळधीकर** | ९६-९९ |
| २० | विश्व उपयोगी योगदर्शन<br>**सौ. संगीता गजानन वायचाळ** | १००-१०७ |
| २१ | भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्म यांचा परस्पर संबंध श्रीवासुदेवानन्द सरस्वती यांचे विचार<br>**डॉ. सौ. श्रुतकीर्ति महेश गणोरकर** | १०८-११२ |
| २२ | वैश्विक दृष्टिकोनातून योगदर्शनातील यमाचे महत्व<br>**सुजाता द्रव्यकार** | ११३-११९ |
| २३ | बौद्ध दर्शनातील निर्वाण व योग दर्शनातील कैवल्य संकल्पना यांचा तौलनिक अभ्यास<br>**सुषमा चंद्रकांत कांबळे**<br>**डॉ. कलापिनी अगस्ती** | १२०-१२७ |
| २४ | भारतीय दर्शनामध्ये न्याय<br>**डॉ. तनुजा वाघमारे** | १२८-१३२ |
| २५ | वल्लभाचार्यांचे शुद्धाद्वैत<br>**सौ. वंदना विनय बखले** | १३३-१३८ |

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# १७. ऋग्वेदात दार्शनिक (तात्विक) चिन्तन

**प्रा. राजेंद्रप्रसाद किशनराव आर्य**
(संस्कृत विभागप्रमुख), राजर्षी शाहू महाविद्यालय, लातुर (स्वायत्त).

आर्यांचे दार्शनिक चिन्तन ऋग्वेदातूनच प्रारम्भ होतो. आत्मा-परमात्मा, सृष्टी उत्पत्ती, मृत्यू पुनर्जन्म, मोक्ष आदी तात्विक विषयांचे ऋग्वेदात गहन चिन्तन केले गेले आहे.

अ) **ईश्वर जीव प्रकृती :** आर्यांच्या धर्मात सृष्टीची रचना आणि विश्वाच्या संचलनासाठी ईश्वर जीव व प्रकृती या तीन तत्वांच्या सत्ता स्वीकारली गेली आहे. जीव आणि प्रकृतीच्या संयोगाने सृष्टीची उत्पत्ती होते. ईश्वरयाचा नियामक व संचालक आहे. प्रकृती द्वारा जीव (बन्धनात) बांधून राहतो आणि जन्म मरणाच्या चक्रात पडून राहतो. तत्वज्ञान झाल्याने तो या बंधनातून मुक्त होतो आणि मोक्षाच्या परम आनन्दाला प्राप्त करतो. ऋग्वेदाच्या अनेक मन्त्रात या त्रैतवादाला पुष्ट केला गेला आहे.

**जसे : द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।**

**तयोरन्यः पिप्पलं स्वाध्दत्यनश्नन्नन्यो अभिचाक शीते ।**

**ऋ.1-164-20**

सुन्दर पंख वाले व समान आयु वाले दोन पक्षी मित्र समान रूपाने विश्वाचे आलिंगन करीत आहेत. त्यांच्यातून एक स्वादिष्ट पिंपळाचा आस्वादन घेत आहे आणि दुसरा भोग न करीत असून देखील आनंद मिळवीत आहे. यात विश्व प्रकृती आहे. पिंप्पळ त्याचे भोग्य पदार्थ आहेत. आस्वादन करणारा पक्षी जीव आहे आणि भोग न करणारा दुसरा पक्षी ईश्वर आहे. याच प्रकारे -

**तद् विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः ।**

**दिवीव चक्षुराततम् ।**

येथे विष्णु परमात्मा साठी 'सूरयः' जीवांसाठी 'दिवीव चक्षुः' प्रकृती रूपासाठी प्रयुक्त आहे.

**ब) सृष्टी उत्पत्ती -** सृष्टी उत्पत्तीच्या संबंधात ऋग्वेदात 6-7 सूक्त आहेत. त्यात नासदीय सूक्त, हिरण्यगर्भ सूक्त आणि पुरुष सूक्त खूप प्रसिध्द आहेत. नासदीय सूक्तात सृष्टी उत्पत्तीच्या अगोदर या अवस्थेचे वर्णन करून त्याच्या रचनेचे क्रम सांगितले आहे. त्या वेळी सत् किंवा असत् नव्हते. लोक, आकाश, गती, स्थान, जन्म-मृत्यू, दिवस-रात्र काही पण नव्हते. तो एकमात्र सर्वशक्तीमान परमेश्वर अन्तर चेतना च्या बरोबर निर्वात अवस्थेत शान्त रूपात वर्तमान होता. त्याच्यात इच्छा निर्माण झाली आणि सृष्टीचे बीज उत्पन्न झाले. तो स्वतः कोठून उत्पन्न झाला. ही

सृष्टी कोठून उत्पन्न झाली. देवता सृष्टीच्या अगोदर वा नंतर उत्पन्न झाले हे कोण जाणतो ? हा परमेश्वरच त्या सृष्टीचा अध्यक्ष आहे. त्यालाच मुख्य ओळखावे.

**हिरण्यगर्भः समवर्ततात्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।**

**सदाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ।।**

**ऋ.1-10-121-1**

हिरण्यगर्भ सूक्तात सृष्टी उत्पत्तीचे वर्णन आहे. सर्वात अगोदर हा हिरण्यगर्भ परमात्माच होता. तो उप्तन्न झालेल्या सर्व पदार्थांचा अधिपती होता. त्यानेच पृथ्वीलोक आणि द्युलोकाला धारण केले आहे. तोच आत्माचा अविर्भाव करणारा आणि मृत्यू देणारा आहे. सर्व देव त्याचीच उपासना करतात. त्याच सुख स्वरूप हिरण्यगर्भ परमेश्वराची आम्ही उपासना करू.

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळात पुरुष सूक्तामध्ये पुरुष रुप परमात्म्याच्या स्वरूपाच्या वर्णनाबरोबर सृष्टीच्या उत्पत्तीच्या रूपाचे देखील वर्णन केलेले आहे. जे काही वर्तमान काळात आहे. भूतकाळात होते आणि भविष्यात होईल. तो पुरुषच आहे. त्या पुरुषांनी विराट आणि विराटनी अधिपुरुषाची उत्पत्ती झाली.

**"पुरुष एवेदं सर्व यद् भूतं यच्च भाव्यम्" ऋ.10-9-2**

ऋग्वेदात वर्णित सृष्टीच्या विकास क्रमाची विस्तृत आणि वेगवेगळ्या प्रकारची व्याख्या भारतीय दर्शनात केली गेली आहे.

**क) मृत्यू आणि पुनर्जन्म -** ऋग्वेदात मृत्यूच्या नंतर जीवाची गती आणि पुनर्जन्माच्या संबंधात खूप वर्णन केले गेलेले आहे. मृत्यूनंतर जीवाच्या मार्गाचे निर्देशन यम करतो. यमराज जीवाला त्या मार्गाने घेवून जातो जेथून त्याचे पूर्वज गेले होते. ते स्थान आनंदानी परिपूर्ण आहे. -

**प्रेहि प्रेहि पथिभि पूर्व्येभिर्यत्रा न पूर्वे पितरः परेयुः ।**

**उभा राजाना स्वध्या मदन्ता यमं पश्यामि वरुणं च देवम् ।**

ज्या ठिकाणावर आमचे प्राचीन पंजोबा आदी गेलेले आहेत पूर्वकाळात बनविलेल्या त्या मार्गांनी लवकर जा. आणि जावून अन्नानी तृप्त होणाऱ्या तेजस्वी शरीरवाल्या यम आणि वरुण देवाला पाहू.

ऋग्वेदाच्या या मंत्राच्या आधारावर पुराणांमध्ये पितृलोकाची कल्पना केली गेली आहे. यमाला मृत्यूचा देवता देखील म्हंटले गेले आहे..

ऋग्वेदात मृत्यूनंतर पुनर्जन्म होतो. याची पुष्टी केली गेली आहे. या खालील मंत्राने पुनर्जन्माच्या सिध्दान्ताची पुष्टी होते.

**असुनीते पुनरस्मासु चक्षुःपुन प्राणमिह नो धेहि भोगम् ।**

**ज्योक् पश्येम सूर्यमुच्चरन्तमनुमते मृळया नो स्वस्ति ।।**

तो परमेश्वर पुन्हा प्राणांची प्रतिष्ठापना करतो. पुन्हा चक्षु आदी इंद्रियांना, प्राणांना आणि भोगांना धारण करतो. हे परमेश्वर ! आम्ही आपल्या कृपेने उदय होणाऱ्या सूर्याला दीर्घकाळा पर्यंत पाहत राहू. सर्वांना मान देणारे हे प्रभो ! तुम्ही आम्हाला सुखी ठेवा.आमचे कल्याण होवो.

ऋग्वेदाच्या परवर्ती साहित्यात आणि दुसऱ्या वेदात आणि वैदिक साहित्यात पुनर्जन्माचे विवेचन खूप विस्ताराने केलेले आहे.

**ड) मोक्ष :** ऋग्वेदात मोक्षाला सर्वात जास्त आनंदाचा हेतु म्हंटला गेला आहे.मोक्ष, सत्य, श्रध्दा, तपस्या आणि आध्यात्मिक ज्ञानाने प्राप्त होते. ज्ञान रूपी ज्योतीनी मोक्षमार्गाचे सर्व विघ्न दूर होतात. ऋग्वेदाच्या नवम मंडळात भक्त देवाला प्रार्थना करतो - हे प्रभो ! मला त्या परम मोक्ष लोकात स्थान प्रदान कर जेथे निरन्तर ज्योती आणि परमानंद राहतो. ऋग्वेदाच्या या खालील मन्त्रात मोक्षाची कामना केली गेली आहे -

**ये यज्ञेन दक्षिणया समक्ता इन्द्रस्य सख्यममृतत्वमानशु ।**

**तेभ्यो भद्रमंगिरसो वो अस्तु प्रति गृभ्णीत मानवं सुमेधसः ।।**

ज्यांनी यज्ञाद्वारा आणि दान केल्याने मुक्ती मिळवली आहे. ते इन्द्राची मित्रता प्राप्त करून मोक्षाला प्राप्त झालेले आहेत. त्यांचे कल्याण झाले आहे. त्यांचे प्राण त्यांच्या बुध्दीला वाढविणारे असतात. त्या मोक्षप्राप्त मनुष्याला पूर्वमुक्त जीव आपल्या जवळ ठेवून घेतात.

**सतः बन्धुमसति निरविन्दन् ।**

**हृदि प्रतीष्या कवयो मनीषा ।।**

**ऋ. 10-139-4**

ऋग्वेदीय दार्शनिक / तात्विक मान्यता परवर्ती काळात विकसित झाली. या प्रकारे उपनिषद काळात वैदिक दार्शनिक विचारांची परिपक्वता मिळते. परम सत्ता, जगतस्वरूप, सृष्टीची समस्या, व्यक्ति विश्लेषण व त्याचे अन्तिम लक्ष्य, त्याचे आदर्शकर्म, मोक्ष, बन्ध, आणि पुनर्जन्म विषयक गोष्टी ऋग्वेदानंतर उपनिषदात प्राप्त होतात. याच औपनिषदिक मान्यतांना परवर्ती षड् दर्शनांनी स्वीकारले आहे.

अशा प्रकारे ऋग्वेद काळापासून व नंतरच्या वाङमयात देखील या तात्विक गोष्टींची खूप सविस्तर माहिती मिळते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) वैदिक साहित्य और संस्कृति - आचार्य बलदेव उपाध्याय
2) वैदिक साहित्य और संस्कृति - वाचस्पती गैरोला
3) भारतीय दर्शन - डॉ.राधाकृष्णन
4) वैदिक साहित्य का इतिहास - डॉ.राजकिशोर सिंह
5) ऋक् सूक्त संग्रह - डॉ.हरिदत्त शास्त्री